महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

।। उद्यमात् सकल समृध्दिः ।।

महौविम

अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम सन २०२६-२०२७

आणि

सुधारित अंदाज पत्रक सन २०२५-२०२६

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

सदस्य

(दिनांक ०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६)

(महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ कलम ४ अन्वये नेमण्यात आलेले)

अध्यक्ष	:	डॉ. उदय सामंत	०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६
उपाध्यक्ष	:	श्री. इंद्रनील नाईक	०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६
शासकिय सदस्य व आर्थिक सल्लागार	:		
पदसिद्ध सदस्य	:	१. अध्यक्ष, महाराष्ट्र विद्युत मंडळं मुंबई. २. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ मर्यादित (सिकॉम) ३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई. ४. उपाध्यक्ष व मुख्यकार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई.	
नामनिर्दिष्ट सदस्य	:		
मुख्य कार्यकारी अधिकारी व पदसिद्ध सदस्य सचिव	:	श्री. पी. वेलरासू	०१.०४.२०२५ ते ३१.०३.२०२६

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

***

सन २०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

आणि

सन २०२५-२०२६ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक

अनुक्रमणिका

अर्थसंकल्प सन 2025-2026, सुधारीत अर्थसंकल्प सन 2025-2026 आणि अर्थसंकल्प सन 2026-2027

तक्ता क्रमांक	तपशिल	पृष्ठ क्रमांक
	प्रस्तावना	1-23
6	महसूल उत्पन्न आणि खर्च	24
7	भांडवली उत्पन्न आणि खर्च	25
8	अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचासारांश	26-29
॥(1)	भूखंडांच्या अधिमूल्यांची जमा रक्कम व औद्योगिक क्षेत्रांच्या विकासावर भांडवली खर्चाची तरतूद	30-42
॥(२)	औद्योगिक क्षेत्रांचा विकास खर्च आणि तरतूद	43-56
॥(३)	औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी भांडवली खर्चाच्या क्षेत्रनिहाय तरतुदीचा तपशील	57-85
॥(४)	औद्योगिक क्षेत्रामधील जलनि:सारणयोजनेवरीलभांडवलीखर्चवतरतूद	86-88
॥(६)	औद्योगिक क्षेत्रातील सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रे यावरील भांडवली खर्च व तरतूद	89
॥(७ क)व॥(७ ड)	उद्योग भवन / सदन /फ्लॅटेड फॅक्टरी / औद्योगिक वसाहती यावर झालेला भांडवली खर्च व तरतूद	90-91
॥(8)	इंडस्ट्रीयल हौसिंग / हेलिपॅड यावर झालेला भांडवली खर्च व तरतूद	92
॥(९ अ)	अनिवासी इमारती / कार्यालयसंकुल / सामाईक सुविधा केंद्र यावरील भांडवली खर्च व तरतूद	93
॥(10)	केंद्रीकृत आणि स्थानिकीकृत पाणी पुरवठा केंद्रावर तरतुदीसह भांडवली खर्च	94-106
॥(११)	माहिती व तंत्रज्ञान उद्याने यावरील भांडवली खर्च व तरतूद	107
॥(१२)	शासनाच्या वतीने भांडवली खर्चासाठी ठेव अंशदान तत्वावर करण्यात आलेली कामे	108-117
॥(१३)	विशेष आर्थिक क्षेत्रावर झालेला भांडवली खर्च व तरतूद	118-119
॥(१४)	ट्रक टर्मिनस यावर झालेला भांडवली खर्च व तरतूद	120
॥(१५)	साधने आणि यंत्रसामग्री तरतूद	121-122
॥(१६)	अग्निशमन केंद्रे बांधणे यावरील भांडवली खर्चाची तरतूद	123

प्रस्तावना

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ (१९६२ चा एम. ए. एच-३) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची १ ऑगस्ट १९६२ रोजी स्थापना झाली. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम २६ अनुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास आपले पूढील वर्षाचे अर्थविवरण पत्र व कामाचा कार्यक्रम संमती घेण्याच्या उद्देशाने राज्य शासनाकडे सादर करणे आवश्यक असते. सन २०२४-२०२५ चे मुळ आर्थिक विवरण पत्र व कामाचा कार्यक्रम त्यासोबत सन २०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तसेच २०२५-२०२६ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि सन २०२६-२०२७ चे मुळ अर्थ संकल्पीय अंदाजपत्रक कार्यक्रमाची रुपरेषा तसेच ठळक वैशिष्ट्ये या वर स्पष्टीकरणा सहीत टिप्पणी जोडून सादर करण्यात येत आहे.

मुख्य लेखा अधिकारी

मुख्य कार्यकारी अधिकारी

कार्यक्रमाची रूपरेषा

२.१ **प्रास्तविक :** महाराष्ट्र राज्यात उद्योगधंद्याची संतूलित स्थापना, वाढ व विकास व्हावा आणि साधारणपणे त्यांच्या उभारणीत मदत व्हावी, हया उद्देशाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ (१९६२ सालच्या एम.ए.एच.-३) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली. सर्व राज्याचा संतुलित औद्योगिक विकास घडवून आणणे आणि त्यातही राज्याच्या विकसनशिल व मागास विभागातील औद्योगिक क्षेत्राच्या विकासावर विशेष भर देणे हे महामंडळाचे मुख्य उद्दीष्ट साध्य करण्यासाठी महामंडळाने जवळपास सर्व जिल्हयात मिळून ३०६ औद्योगिक क्षेत्र कार्यान्वित आहेत.

२.२ **जमिन संपादन** : औद्योगिक विकासासाठी महामंडळाने ३१.०३.२०२५ पर्यत ७२८२२.५१ हेक्टर जमिन नियोजित केली असून नियोजित जमिनीपैकी ६१५९३.५० हेक्टर जमिन ताब्यात आली आहे. खाजगी मालकीची जमिन संपादन करण्याचा खर्च शासन सर्वसाधारणपणे आपल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविते. परंतू शासनाच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद नसल्यामुळे व जमिन संपादन लवकर व्हावे म्हणून महामंडळ शासनाला खात्यावर आगाऊ दिलेल्या रक्कमेस्वरूपात जमिनीचा मोबदला मोठया प्रमाणात चुकता करते, त्यानुसार महामंडळाने जमिनीचा मोबदला म्हणून शासनाला ३१ मार्च २०२५ पर्यत रु.११३३२१८.१० लक्ष अदा केले आहेत.

२.३ **कार्यपूर्ती :** स्थापन केलेल्या औद्योगिक क्षेत्रात भूखंड, रस्ते, पाणीपुरवठा, जलनि:सारण, दिवाबत्ती, अग्निशमन केंद्रे इत्यादी मुलभूत सुविधा पुरविणे हे महामंडळाचे मुख्य कार्य आहे. या व्यतिरिक्त महामंडळ छोटया उद्योजकांना शेडस व गाळे सुध्दा देते.
महामंडळाने ३१.०३.२०२४ पर्यत १०२०२८ भूखडांपैकी ९४६१० भूखंड (शेडस व गाळे यांच्या खाली येणा-या भुखंडासहित) वितरित केले आहेत. महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनांची प्रस्थापित क्षमता प्रतिदिन २५७६.५५ दशलक्ष लीटर आहे.

२.४ **साधन संपत्ती :** जमिन, **शेड्स,** गाळे व पाणी विक्रीपासून होणारी जमा तसेच गरज भासल्यास खुल्या बाजारातील व वित्तिय संस्थांकडून घ्यावयाची कर्जे हे महामंडळाचे साधनसंपत्तीचे मुख्य मार्ग आहेत.

निर्माण केलेली मालमत्ता : महामंडळाने ३१.०३.२०२५ पर्यत आपल्या औद्योगिक क्षेत्रात मुलभूत सुविधा पूरविण्यासाठी रु.२४२०३११.७२ लक्ष खर्च केले आहेत. या रक्कमेपैकी औद्योगिक क्षेत्रांच्या विकासावर रु.१२५०६९६.४६ लक्ष , जलनि:सारण व घनकचरा विल्हेवाट इत्यादीवर रु.२६९९०१.७६ लक्ष व पाणीपुरवठा योजनांवर रु.७५९४२४.३१ लक्ष खर्च केले आहेत. या व्यतिरिक्त महामंडळाने मुंबई व पुणे महानगर प्राधिकरण विभाग व छत्रपती संभाजीनगर, चिखलठाणा विभागात मोठया स्वरूपात केंद्रीकृत पाणीपूरवठा योजना कार्यन्वित केल्या आहेत. दूसरी ठळक गुंतवणूक म्हणजे शेडस, गाळे, सुवर्ण लघू उद्योग, इलेक्ट्रॉनिक वसाहती, माहिती तंत्रज्ञान उद्याने व इतर यांवर महामंडळाने रु.१४०२८९.१९ लक्ष खर्च केलेला आहे.

२०२५-२०२६ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज व
२०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे कलम २६ नुसार तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम १९६२ मधील नियम २४ नुसार महामंडळाने पुढील वर्षाचे अंदाजपत्रक व कामाचा कार्यक्रम व चालू वर्षाचे सुधारीत अंदाजपत्रक प्रत्येक वर्षी राज्य शासनास मंजूरीकरीता सादर करावयाचा असतो. राज्य शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर तो राज्याच्या दोन्ही वैधानिक सभागृहापूढे मांडण्यात येतो.

२.१ वित्तीय वर्ष २०२५-२०२६ चे मूळ अंदाज, २०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज व वित्तीय वर्ष २०२६-२०२७चे मूळ अंदाज संक्षीप्तपणे खालीलप्रमाणे आहेत.

(रूपये लाखात)

अ. क्र	तपशील	२०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	२०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज
१.	महसूली जमा	१५६१७६.०६	१४९०२८.७५	१५२०६२.६५
२.	महसूली खर्च	२४३०६५.५९	२७१७५३.८४	२८९८९३.८९
	महसूली तूट (१-२)	(-)**८६८८९.५३**	**(-)१२२७२५.०९**	**(-)१३७८३१.२४**
३.	भांडवली जमा	५००९२०.५१	८५२२५९.१९	६७९५५५.९९
४.	भांडवली खर्च	१११४२६९.६४	९९३८४५.०६	१९०११९४.८२
	भांडवली तूट (३-४)	(-)**६१३३४९.१२**	**(-)१४१५८५.८७**	**(-)१२२१६३८.८३**
१.	महसूली जमा	१५६१७६.०६	१४९०२८.७५	१५२०६२.६५
२.	भांडवली जमा	५००९२०.५१	८५२२५९.१९	६७९५५५.९९
	एकूण जमा	**६५७०९६.५७**	**१००१२८७.९४**	**८३१६१८.६४**
१.	महसूली खर्च	२४३०६५.५९	२७१७५३.८४	२८९८९३.८९
२.	भांडवली खर्च	१११४२६९.६४	९९३८४५.०६	१९०११९४.८२
	एकूण खर्च	**१३५७३३५.२३**	**१२६५५९८.९०**	**२१९१०८८.७१**

सन २०२५-२०२६ वर्षात महसूली व भांडवली जमा रु.६५७०९६.५७ लक्ष वरून रु.१००१२८७.९४ लक्ष अशी सुधारीत करण्यात आलेली असून सन २०२६-२०२७ साठी रु.८३१६१८.६४ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. सन २०२५-२०२६ मध्ये महसूली व भांडवली खर्च रु. १३५७३३५.२३ लक्ष वरून रु.१२६५५९८.९० लक्ष असा सुधारीत करण्यात आलेला आहे व २०२६-२०२७ साठी रु.२१९१०८८.७१ लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

२.२ **<u>महसूली उत्पन्न</u>:** सन २०२५-२०२६ चा मूळ अर्थसंकल्प व सुधारीत अर्थसंकल्पाच्या महसूली उत्पन्नाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रूपये लाखात)

अ.क्र	योजनाचे नाव व तपशील	२०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	वाढ / घट %
१	२	३	४	५
१.	पाणीपट्टी	१०८०६३.९९	१०५०१९.११	(-)२.८२
२.	सेवाशुल्क	१५६७५.५७	१६९४४.१६	८.०९
३.	अग्निशमन शुल्क	३२७७.९१	३५१०.००	७.०८
४.	जलनि:सारण शुल्क	१०३८१.११	६७११.११	(-)३५.३५
५.	इतर महसूल / निवासी इमारती	१८२३४.२०	१६१६०.३६	(-)११.३७
७.	व्याज	५४३.२८	६८४.०१	२५.९०
	एकूण महसूल	**१५६१७६.०६**	**१४९०२८.७५**	**(-)४.५८**

सदरहू वर्षात पाणीपट्टी शुल्कातुन रु. १०५०१९.११ लक्ष इतका महसूल अपेक्षित आहे. तसेच सेवाशुल्क व अग्निशमन शुल्कापोटी रु. २०४५४.१६ लक्ष इतका महसूल अपेक्षित आहे. जलनि:सारण रु. ६७११.११लक्ष, व्याज रु. ६८४.०१ लक्ष व इतर महसुल रु. १६१६०.३६ लक्ष इतका अपेक्षित आहे. सन २०२५-२०२६ च्या तुलनेत सुधारीत अंदाजपत्रकात (-) ४.५८% घट होण्याची शक्यता आहे.

२.३ **<u>महसूली खर्च</u> :** सन २०२५-२०२६ चा मूळ अर्थसंकल्प व सुधारीत अर्थसंकल्पाच्या महसूली खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रूपये लाखात)

अ. क्र	योजनाचे नाव/ खर्चाचा तपशील	२०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय मूळ अंदाज	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	वाढ / घट (%)
१	२	३	४	५
१.	<u>प्रशासकीय व अमंलबजावणी खर्च</u>			
	अ) आस्थापना खर्च	२३८६६.२७	२६३५७.३६	१०.४४
	ब) आकस्मिक खर्च	३०५९६.७३	३९४१३.७४	२८.८२
२.	देखभाल व दुरूस्ती पाणी पुरवठा योजना	१७६९२७.६१	१८८१९५.३६	६.३७
३.	देखभाल व दुरूस्ती औद्योगिक क्षेत्र	१५२५५.९०	२०७८४.१२	३६.२४
४.	देखभाल व दुरूस्ती मलनि:स्सारण व्यवस्था	१४२६७.७३	१४३७०.१२	०.७२
५.	देखभाल व दुरूस्ती अग्नीशमन केंद्रे	६१४९.५७	३३७६.८९	(-)४५.०९
६.	देखभाल व दुरूस्ती निवासी इमारती	१७७६.१७	२७२२.३९	५३.२७
७.	देखभाल व दुरूस्ती अनिवासी इमारती	९४९१.३५	१०८८९.४८	१४.७३
८.	देखभाल व दुरूस्ती यंत्रसामुग्री	३६२०.२५	३३४७.३७	(-)७.५४
९.	व्याज	१२३४.३६	१२५३.६७	१.५६
१०.	इतर	३५८९.६७	५४६७.१५	५२.३०

११.	घसारा	६६५.५०	१४०००.००	
	एकूण	**२८७४४१.११**	**३३०१७७.६४**	**१४.८७**
	(-) **: भांडवली खर्चासाठी स्थानांतरीत**	४४३७५.५२	५८४२३.८०	३१.६६
	निव्वळ महसूली खर्च	**२४३०६५.५९**	**२७१७५३.८४**	**११.८०**
	महसूली तूट	**(-)८६८८९.५३**	**(-)१२२७२५.०९**	**४१.२४**

पाणी पुरवठा योजना, अग्निशमन केंद्रे देखभाल व दुरुस्तीच्या कामाच्या खर्चामध्ये वाढ प्रस्तावित आहे. सन २०२५-२०२६ च्या मूळ अंदाजपत्रकाच्या तुलनेत सुधारीत अंदाजपत्रकातील निव्वळ महसूली खर्चामध्ये सरासरी ४१.२४% वाढ होण्याची शक्यता आहे.

२.४ **भांडवली उत्पन्न :** सन २०२५-२०२६ च्या मूळ अर्थसंकल्पाचा व सुधारीत अर्थसंकल्पाच्या भांडवली उत्पन्नाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र	**योजनाचे नाव व तपशील**	**२०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज**	**२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज**	**वाढ / घट (%)**
१	**२**	**३**	**४**	**५**
१.	जमिनीचे अधिमूल्य	१६२९२६.०१	५७९४४६.४३	
२	विशेष आर्थिक क्षेत्रातील भूखंड	०.००	५४.७५	-
३	शेड / गाळा	०.००	३१.५०	-
४	माहिती तंत्रज्ञान उद्याने व बहुमजली इमारती	५३.९९	१०.००	(-)८१.४८
५	पर्यावरण शुल्क	६१५५.७०	९५५४.५८	५५.२२
६	वार्षिक भाडे/ संकिर्ण	४९३.८५	२७१२.१०	
७	विकास शुल्क	३८३५९.२७	४८१७२.३२	२५.५८
८	अग्निशमन सुरक्षा फी	१४५६९.९०	१५०००.०८	२.९५
९	शासनाच्या ठेवीवरील व्याज	४९०२२.००	५६७८४.००	१५.८३
१०	इतर संकीर्ण ठेवी	१५६८३१.०५	६६१६५.३४	(-)५७.८१
११	अनामत तत्वावरील कामे	७२५०८.७४	७४३२८.०९	२.५१
	एकुण भांडवली जमा	**५००९२०.५१**	**८५२२५९.१९**	**७०.१४**

जमिनीचे अधिमूल्यात सन २०२५-२०२६ च्या मूळ अंदाजत्रकाच्या तुलनेत सुधारीत अंदाजपत्रकात २५५.६५% टक्के वाढ प्रस्तावीत करणेत आली आहे. पर्यावरण शुल्क, विकास शुल्कामध्ये आतापर्यंत या वर्षात प्राप्त उत्पन्नाच्या आधारे सुधारीत अंदाजपत्रकात तरतूद प्रस्तावित केली आहे. सन २०२५-२०२६ च्या तुलनेत एकूण सुधारीत अंदाज पत्रकात ७०.१४ % टक्के वाढ होण्याची शक्यता आहे.

२.५ **भांडवली खर्च : सन** २०२५-२०२६ चे मूळ अर्थसंकल्प व सुधारीत अर्थसंकल्पाच्या भांडवली खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र	योजनाचे नाव/ खर्चाचा तपशील	२०२५-२०२६ चे अर्थसंकल्पीय मूळ अंदाज	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	वाढ/घट %
१	२	३	४	५
१	औद्योगिक क्षेत्राचा विकास	३५४४००.५१	३६८१६८.०५	३.८८
२	विशेष आर्थिक क्षेत्र	५६.१०	०	-
३	जलनि:सारण / घन कचरा व्यवस्थापन	४८७२०.२३	४८६५७.०७	(-)०.१३
४	सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र	६५१.९१	२७५.९१	(-)५७.६८
५	उद्योग सदन / उद्योग भवन	४.००	०.००	-
६	डी.एम.आय.सी किरकोळ खर्च	०.६०	१०.९०	-
७	अनिवासी इमारती, कचेरी संकुल,सी.एफ.सी.,	७०२.५०	३५२.८०	(-)४९.७८
८	माहिती तंत्रज्ञान उद्याने	५०.१०	१०१०.६०	-
९	पाणी पुरवठा योजना	२२३२२३.९०	१९५४९२.९५	(-)१२.४२
१०	अनामत तत्वावरील कामे	७२५०८.७४	७४३२८.०९	२.५१
११	ट्रक टर्मिनस, रहिवासी इमारती, औद्योगिक वसाहती	७०२.००	८९७.५०	२७.८५
१२	अग्निशमन केंद्रे बाधणे	९८१.००	१२९५.५४	३२.०६
१३	मुख्यालयातील अग्निशमन/सामान्य प्रशासन /अभियांत्रिकी/माहिती तंत्रज्ञान विभाग / संयत्रे	२३०७८.१०	२६२६६.२६	१३.८१
१४	साठा	५५०.००	५५०.००	०
१५	गुंतवणूक	३००.००	३००.००	०
१६	आगाऊ रकमा	२९७०३.४३	२६०९०.५९	(-) १२.१६
१७	मॅगनेटिक महाराष्ट्र	३०२५.००	३०२५.००	०
१८	जमिनीचा मोबदला	२८८६३९.००	१८६२२५.००	(-)३५.४८
१९	डी.एम.आय.सी. जमीनीचा मोबदला	२५६२२.००	५५००.००	(-)७८.५३
२०	(+) विकास कामांसाठी महसूली खर्चातून स्थानांतरीत	४४३७५.५२	५८४२३.८०	३१.६६
	एकूण भांडवली खर्च	**१११४२६९.६४**	**९९३८४५.०६**	(-)१०.८१
	भांडवली तूट	**(-)६१३३४९.१२**	**(-)१४११८५.८७**	**(-)७६.९२**

औद्योगिक क्षेत्रातील विकास कामे जसे रस्ते, दिवाबत्ती, इमारती, पाणी पुरवठा वितरण व्यवस्था यासाठी २०२५-२०२६ च्या मूळ अंदाजपत्रकीय तरतूद रू.३५४४००.५१ लक्ष सुधारीत करून रू. ३६८१६८.०५ लक्ष इतकी प्रस्तावित करण्यात आली आहे.

जलनि:सारण / घन कचरा व्यवस्थापन योजनेअंतर्गत २०२५-२०२६ च्या मूळ अंदाजपत्रकीय तरतूद रू. ४९३७२.१४ लक्ष सुधारीत करून रू. ४८९३२.९८ लक्ष इतकी प्रस्तावित करण्यात आली आहे

तसेच केंद्रीय व स्थानिक पाणीपुरवठा योजना यावरील कामावर सन २०२५-२०२६ मूळ अंदाज पत्रकीय तरतूद रु. २२३२२३.९० लक्ष वरुन रु. १९५४९२.९५ लक्ष एवढी सुधारीत करण्यात आलेली आहे

जमिनीचा मोबदला या शिर्षाखाली मूळ तरतुद रु. २८८६३९.०० लक्ष एवढी होती ती रु.१८६२२५.०० लक्ष इतकी सुधारीत केली आहे.

नांदेड, लातूर, ठाणे, अलिबाग, कोपरगाव, अहिल्यानगर,जालना, बारामती, नागपूर, वर्धा, सिन्नर इ. औद्योगिक क्षेत्रात अनामत तत्वावरील कामासाठी मूळ अंदाज पत्रकीय तरतूद रु. ७२५०८.७४ लक्ष वरुन रु. ७४३२८.०९ लक्ष अशी सुधारीत करण्यात आली आहे.

३.० **<u>सन २०२६-२०२७ चे अंदाज पत्रक</u> :**

३.१ **:** वित्तिय वर्ष २०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज व वर्ष २०२५-२०२६ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज संक्षिप्तपणे खालील प्रमाणे आहेत.

(रुपये लाखात)

अ.क्र	तपशील	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	२०२६-२०२७चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	वाढ/घट (%)
१.	महसूली जमा	१४९०२८.७५	१५२०६२.६५	२.०४
२.	वजा महसूली खर्च	२७१७५३.८४	२८९८९३.८९	६.६८
	महसूली तूट (१-२)	**(-)१२२७२५.०९**	**(-)१३७८३१.२४**	१२.३१
३.	भांडवली जमा	८५२२५९.१९	६७९५५५.९९	(-)२०.२६
४.	वजा भांडवली खर्च	९९३८४५.०६	१९०११९४.८२	९१.३०
	भांडवली तूट	**(-)१४१५८७.८७**	**(-)१२२१६३८.८३**	

३.२ **महसूली उत्पन्नः-** सन २०२५-२०२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२६-२०२७ च्या मूळ अर्थसंकल्पातील महसूली जमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र	योजनाचे नाव व तपशील	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	२०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	वाढ/घट (%)
१	२	३	४	५
१.	पाणीपट्टी	१०५०१९.११	१०५७६५.०८	०.७१
२.	सेवाशुल्क	१६९४४.१६	१८०३४.९४	६.४४
३.	अग्निशमन शुल्क	३५१०.००	३७५८.२७	७.०७
४.	जलनि:सारण	६७११.११	७१९२.७९	७.१८
५.	इतर महसूल / निवासी इमारती	१६१६०.३६	१६५९३.३५	२.६८
६.	व्याज	६८४.०१	७१८.२१	५.००
	एकूण महसूल	**१४९०२८.७५**	**१५२०६२.६५**	**२.०४**

३.३ **महसूली खर्च :** सन २०२५-२०२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व २०२६-२०२७च्या मूळ अर्थसंकल्पातील महसूली खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे.

(रुपये लाखात)

अ.क्र	योजनाचे नाव/ खर्चाचा तपशील	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	२०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	वाढ / घट (%)
१	२	३	४	५
१.	**प्रशासकीय व अमंलबजावणी खर्च**			
	अ) आस्थापना खर्च	२६३५७.३६	२८५७८.००	८.४३
	ब) आकस्मिक खर्च	३९४१३.७४	४४७११.५७	१३.४४
२.	देखभाल व दुरूस्ती पाणी पुरवठा योजना	१८८१९५.३६	१९९५६१.१९	६.०४
३.	देखभाल व दुरूस्ती औद्योगिक क्षेत्र	२०७८४.१२	२११२३.९९	१.६४
४.	देखभाल व दुरूस्ती मलनि:स्सारण व्यवस्था	१४३७०.१२	१५४२४.४४	७.३४
५.	देखभाल व दुरूस्ती अग्नीशमन केंद्रे	३३७६.८९	४०६२.४३	२०.३०
६.	देखभाल व दुरूस्ती निवासी इमारती	२७२२.३९	३००७.९५	१०.४९
७.	देखभाल व दुरूस्ती अनिवासी इमारती	१०८८९.४८	११२५९.९१	३.४०
८.	देखभाल व दुरूस्ती यंत्रसामुग्री	३३४७.३७	३६३७.९९	८.६८
९.	व्याज	१२५३.६७	१३१६.३५	५.००
१०.	इतर	५४६७.१५	५७४०.५१	५.००
११.	घसारा	१४०००.००	१५०००.००	७.१४
	एकूण	**३३०१७७.६४**	**३५३४२४.३३**	**७.०४**

	(-) : **भांडवली खर्चासाठी स्थानांतरीत**	५८४२३.८०	६३५३०.४४	८.७४
	निव्वळ महसूली खर्च	**२७१७५३.८४**	**२८९८९३.८९**	**६.६८**
	महसूली तूट	**(-)१२२७२५.०९**	**(-)१३७८३१.२४**	**१२.३१**

वित्तीय वर्ष २०२६-२०२७ मध्ये पाणीपुरवठा योजना, मलनि:सारण व्यवस्था, अग्निशमन केंद्रे, निवासी इमारती, अनिवासी इमारती व सयंत्रे, अग्निशमन केंद्रे यांच्या देखभाल दुरुस्ती वरील खर्चात मागील वर्षाच्या तुलनेत वाढ संभावित आहे. एकूणच निव्वळ महसूली खर्चामध्ये १२.३१% वाढ अपेक्षित आहे.

औद्योगिक धोरणाला चालना देण्याच्या दृष्टीने महामंडळ विविध औद्योगिक क्षेत्रांची निर्मीती करत असल्याने या औद्योगिक क्षेत्रांमध्ये पाणी पुरवठा, रस्ते, पथकर दिवे, घन:निसारण, सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र, अग्निशमन केंद्रे या सारख्या सोयीसुविधांची देखभाल व दुंरुस्ती तसेच अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व इतर भत्ते अश्या आस्थापना खर्चापोटी महसूली खर्च करणे महामंडळाला अनिवार्य आहे.

उपरोक्त नमूद महसूली खर्च वसूल करण्यासाठी महामंडळामार्फत ग्राहकांकडून विविध प्रकारचे शुल्क, जसे पाणीपुरवठा शुल्क, सेवा शुल्क, अग्निशमन शुल्क, घन:निसारण शुल्क, सामाईक सांडपाणी प्रक्रिया शुल्क वगैरे आकारले जातात.

तथापि, पाणी पुरवठा योजने वर आकारण्यात येणारे स्वामित्व धन, वीज शुल्काचे दर यामध्ये संबंधित विभागामार्फत दरवर्षी दरवाढ करण्यात येते. तसेच विविध ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका यांचे नावे थकबाकी दिसून येते. सबब, औद्योगिक वसाहतींमधून प्राप्त होणारा महसूल व त्यावर होणारा खर्च यामध्ये मेळ बसत नसल्यामुळे महसूली तूट दिसून येते.

सदर तूट भरुन काढण्यासाठी सेवा शुल्काच्या दरांमध्ये २००८ मध्ये, घन:निसारण शुल्काच्या दरांमध्ये २०१३ मध्ये सुधारणा करण्यात आली होती. तसेच पाणी शुल्कांमध्ये सन २०२५ मध्ये अंशत: वाढ करण्यात आलेली आहे.

सबब, पाणी शुल्कांतील वाढीमुळे जमा होणारा महसूल, तसेच ग्राहकांकडे असलेल्या विविध शुल्कांची प्रलंबित देयके व त्यावरील विलंब शुल्क यांच्या वसूलीतून सन २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांमध्ये येणारी महसूली तूट कमी करण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यात अशाप्रकारे प्राप्त होणारा महसूल हा प्रथमत: महसूली खर्चापोटी समायोजित करुन महसूली तूट भरुन काढण्यात येईल. महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या मुदत ठेवी रक्कमेतून महसूली तूट भरुन काढण्याचे प्रस्तावित आहे

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम २६ (१) नुसार महामंडळ अंदाजपत्रक राज्य शासनाकडे सादर करते. तसेच कलम २६ (४) नुसार अंदाजपत्रकाची एक प्रत ही राज्य शासनाला

मिळाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येते. अशा प्रकारे सदर तूटीच्या अंदाजपत्रकास मा.संचालक मंडळाची, राज्य शासन तसेच विधी मंडळाची मान्यता घेणेबाबत प्रस्तावित आहे.

३.४ भांडवली उत्पन्न : सन २०२५-२०२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व २०२६-२०२७च्या मूळ अर्थसंकल्पातील भांडवली उत्पन्नाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

अ. क्र	योजनाचे नाव व तपशील	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	२०२६-२०२७ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	वाढ / घट (%)
१	२	३	४	५
१.	जमिनीचे अधिमूल्य	५७९४४६.४३	३९१२७९.१३	(-)३२.४७
२.	विशेष आर्थिक क्षेत्रातील भूखंड	५४.७५	४५.०५	-१७.७२
३.	शेड / गाळा	३१.५०	३४.६५	१०.००
४.	माहिती तंत्रज्ञान उद्याने व बहुमजली इमारती	१०.००	११.००	१०.००
५.	पर्यावरण शुल्क व जलनि:सारण शुल्क	९५५४.५८	९९१८.८८	३.८१
६.	वार्षिक भाडे/ संकिर्ण	२७१२.१०	२९८१.५७	९.९४
७.	विकास शुल्क/जमिनीचे वार्षिक भाडे	४८१७२.३२	५१८७७.८९	७.६९
८.	अग्निशमन सुरक्षा फी	१५०००.०८	१५५००.००	३.३३
९.	शासनाच्या ठेवीवरील व्याज	५६७८४.००	४२५७७.००	-२५.०२
१०.	इतर संकीर्ण ठेवी	६६१६५.३४	८३२३९.४६	२५.८०
११.	अनामत तत्वावरील कामे	७४३२८.०९	८२०९१.३६	१०.४४
	एकुण भांडवली जमा	**८५२२५९.१९**	**६७९५५५.९९**	**(-)२०.२६**

जमिनीच्या अधिमूल्य शिर्षकात सुधारीत अंदाजपत्रकापेक्षा सन २०२६-२०२७ च्या मूळ अंदाजपत्रकात (-) ३२.४७ % घट प्रस्तावित करण्यात आली आहे. पर्यावरण शुल्क, जलनि:सारण शुल्क, विकास शुल्क, अग्निशमन सुरक्षा फी, व्याज, इतर संकीर्ण ठेवी या बाबींमध्ये वाढ अपेक्षित आहे. एकुणच भांडवली जमेत (-) २०.२६ % घट प्रस्तावित केली आहे.

३.५ भांडवली खर्च : सन २०२५-२०२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व २०२६-२०२७च्या मूळ अर्थसंकल्पातील भांडवली खर्चाचा तपशील खालील प्रमाणे आहे. (रुपये लाखात)

अ. क्र	योजनाचे नाव/ खर्चाचा तपशील	२०२५-२०२६ चे सुधारीत अंदाज	२०२६-२०२७चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज	वाढ/घट %
१	२	३	४	५
१	औद्योगिक क्षेत्राचा विकास	३६८१६८.०५	३७६७६८.१३	
२	विशेष आर्थिक क्षेत्र	०.००	०.००	
३	जलनि:सारण	४८६५७.०७	२६०४४.०५	-४६.४७
४	सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र	२७५.९१	५८७१.८१	
५	उद्योग सदन / उद्योग भवन	०.००	०.००	
६	डी.एम.आय.सी किरकोळ खर्च	१०.९०	१.००	-९०.८३
७	अनिवासी इमारती, कचेरी संकुल,सी.एफ.सी.,	३५२.८०	१८५.१०	-४७.५३
८	माहिती तंत्रज्ञान उद्याने	१०१०.६०	२२.६०	-९७.७६
९	पाणी पुरवठा योजना	१९५४९२.९५	१८९३५१.५१	-३.४१
१०	अनामत तत्वावरील कामे	७४३२८.०९	८२०९१.२६	१०.४४
११	ट्रक टर्मिनस, रहिवासी इमारती, औद्योगिक वसाहती	८९७.५०	२१.००	-९७.६६
१२	अग्निशमन केंद्रे बाधणे	१२९५.५४	८५३.२०	-३४.१४
१३	मुख्यालयातील अग्निशमन/सामान्य प्रशासन/ अभियांत्रिकी/माहिती तंत्रज्ञान विभाग / संयत्रे	२६२६६.२६	२७५०५.००	४.७२
१४	साठा	५५०.००	५५०.००	०.००
१५	गुंतवणूक	३००.००	३००.००	०.००
१६	आगाऊ रकमा	२३०६५.५९	२३९५२.१२	३.८४
१७	मॅगनेटिक महाराष्ट्र	३०२५.००	३३२७.५०	१०.००
१८	जमिनीचा मोबदला	१८६२२५.००	९२५२०२.००	
१९	डी.एम.आय.सी. जमीनीचा मोबदला	५५००.००	१७५६१८.००	
	(+) विकास कामांसाठी महसूली खर्चातून स्थानांतरीत	५८४२३.८०	६३५३०.४४	८.७४
	एकूण भांडवली खर्च	**९९३८४५.०६**	**१९०११९४.८२**	९१.३०
	भांडवली तूट	**(-)१४१५८५.८७**	**(-)१२२१६३८.८३**	

औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सोई-सुविधांच्या विकासाची सन २०२५-२०२६ मध्ये बरीचशी कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सन २०२६-२०२७ मध्ये एकुण भांडवली खर्चात १००% पेक्षा जास्त वाढ अपेक्षित आहे. पाणी पुरवठा योजनेत सुधारीत अंदाजपत्रकापेक्षा (-)३.४१% घट प्रस्तावित आहे. जमिनीचा मोबदला यामधील खर्चात ३९६% वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे.

राज्यात औद्योगिक क्षेत्राची स्थापना करण्याकरिता सर्वप्रथम जमीन संपादित करुन त्यावर मूलभूत पायाभूत सुविधा पुरविणे आवश्यक असते. तद्नंतर अशा औद्योगिक क्षेत्रात विकसित केलेल्या जमिनी भाडेपट्ट्याने देउन महामंडळाला जमिनीचे अधिमुल्य व इतर अनुषंगिक शुल्काच्या माध्यमातून भांडवली जमा प्राप्त होते. औद्योगिक धोरणाला चालना मिळण्याकरिता जमीन संपादन करणे, औद्योगिक क्षेत्राचे विकासकामे व पाणीपुरवठा योजना यासाठी महामंडळाला भांडवली खर्च करणे अनिवार्य आहे.

सबब, भविष्यातील भांडवली उत्पन्न वाढविण्यासाठी तसेच औद्योगिक विकासाला चालना देणे व औद्योगिक विकासाचा विस्तार करणेसाठी प्रथमत: जमीन संपादित करुन त्यावर मूलभूत पायाभूत सुविधा पुरविणे अनिवार्य असल्याने या कामांचा विचार करता उपरोक्त नमूद भांडवली तूट येत आहे. "महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२" च्या नियम २४ (२) अंतर्गत नमूद केलेल्या अंदाजपत्रकाच्या नमून्यामध्ये अंदाजपत्रक तयार करताना महसूली तूट व भांडवली तूट दाखविण्याचे नमूद केले आहे.

महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या मुदत ठेवी रक्कमेतून भांडवली तूट भरुन काढण्याचे प्रस्तावित आहे. तसेच महामंडळाकडील औद्योगिक क्षेत्रात विकसित केलेल्या जमिनी भाडेपट्ट्याने देण्याचा अधिमूल्याचा दर सुधारित करण्याचे विचाराधीन आहे. भविष्यात उपरोक्त नमूद विविध पध्दतीने प्राप्त होणारा महसूल हा प्रथमत: भांडवली खर्चापोटी समायोजित करुन सन २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये येणारी भांडवली तूट भरुन काढण्याचे प्रस्तावित आहे.

"महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१" च्या कलम २१ नुसार -राज्य शासनास, याबाबतीत केलेल्या कायद्याव्दारे राज्य विधानमंडळाकडून योग्य रितीने विनियोजन करण्यात आल्यानंतर, या अधिनियमान्वयेची महामंडळाची कामे पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील अशी अनुदाने, अर्थसहाय्ये, कर्जे आणि आगाऊ रक्कमा महामंडळाला देता येतील.◦ त्यानुसार महामंडळास शासन अनुदान मंजूर करण्याकरीता प्रस्ताव सादर केला आहे. राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त करुन सदरची तूट भरुन काढणेचे प्रस्तावित आहे.

तसेच "महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१" च्या कलम २२ (१) नुसार -विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने महामंडळास स्वत:साठी अर्थप्राप्तीचे पुरेसे मार्ग प्राप्त करुन घेण्यासाठी हमीसहीत किंवा हमीविना असलेली बंधपत्रे, रुणको ,रोखे काढून किंवा अन्यथा, खुल्या बाजारातून, कर्ज घेता येईल, किंवा कोणत्याही अनुसूचित बँकाकडून किंवा त्याबाबतीत राज्य शासनाकडून वेळोवेळी मान्यता देईल अशा इतर बँकाकडून किंवा वित्तीय परिसंस्थाकडून कर्ज घेता येईल.◦ त्यानुसार, वित्तीय संस्थांमार्फत रु.१००००/- कोटीं पर्यंतचे कर्ज घेण्याकरिताची प्रक्रिया महामंडळामार्फत सुरु करण्यात आली आहे. या अनुषंगाने, हुडको (Hudco) कडून महामंडळाला पुरंदर विमानतळ आणि १३ औद्योगिक क्षेत्रांमध्ये जमीन संपादन करण्यासाठी दि.१७/११/२०२५ रोजी रु.६१७३.२० कोटी इतक्या

रक्कमेचे मंजूरीपत्र (Sanction Letter) प्राप्त झाले आहे. त्याचबरोबर, संबंधित औद्योगिक क्षेत्रांचा विकास करण्यासाठी हुडको (Hudco) कडून दि.२२/१२/२०२५ रोजी रु.३८२६.५० कोटी इतक्या रक्कमेचे मंजूरीपत्र (Sanction Letter) प्राप्त झाले आहे. सदरच्या कर्जास महामंडळाच्या मा.संचालक मंडळाची व त्याचबरोबर शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे. अशा प्रकारे कर्ज प्राप्त करुन घेऊन सदरची तूट भरुन काढणेचे प्रस्तावित आहे. त्याचबरोबर सदरच्या औद्योगिक क्षेत्रांचा विकास झाल्यानंतर तेथील जमिनींचे वाटप होऊन भविष्यात त्यामधून जमिनीचे अधिमूल्य , विकास शुल्क ,पर्यावरण शुल्क, अग्निशमन सुरक्षा फी इ. पासूनचे अधिकचे उत्पन्न महामंडळाला मिळणारा असून त्यातून कर्जाची व्याजासह परतफेड होऊन उर्वरित उत्पन्नातून संबंधित वर्षांतील भांडवली तूट कमी करणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या कलम २६ (१) नुसार महामंडळ अंदाजपत्रक राज्य शासनाकडे सादर करते. तसेच कलम २६ (४) नुसार अंदाजपत्रकाची एक प्रत ही राज्य शासनाला मिळाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येते. अशा प्रकारे सदर तूटीच्या अंदाजपत्रकास मा.संचालक मंडळाची, राज्य शासन तसेच विधी मंडळाची मान्यता घेणेबाबत प्रस्तावित आहे.

अंदाजपत्रकातील ठळक बाबी

सन २०२५-२०२६ च्या सुधारीत अंदाजपत्रकातील व सन २०२६-२०२७च्या अंदाजपत्रकातील भांडवली खर्चाच्या मुख्य बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) **औद्योगिक क्षेत्रांचा विकास:-** औद्योगिक क्षेत्राच्या विकासाकरिता सन २०२५-२०२६ च्या सुधारीत अंदाज पत्रकामध्ये रु. **३६८१.६८ कोटी** व सन २०२६-२०२७ च्या मूळ अंदाजपत्रकात रु. ३७६७.६८ कोटी तरतूद केलेली आहे. सदरहू खर्चामध्ये सर्वेक्षण,रस्ते, दिवाबत्ती, इमारती, जलवितरण व्यवस्था इ. योजनांचा समावेश आहे.

२) **केंद्रीय व स्थानिक पाणीपुरवठा योजना:-** मुख्यत्वेकरून बारवी दुहेरीकरण,तसेच पाताळगंगा, पिंपरी-चिंचवड केंद्रीय पाणीपुरवठा योजना व विविध स्थानीक पाणीपुरवठा योजनावरील अपूर्ण राहिलेल्या व नविन कामासाठी सन २०२५-२०२६ च्या सुधारीत अंदाजपत्रकात रु. १९५४.९३ कोटी व सन २०२६-२०२७ करीता रु. १८९३.५२ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

३) **माहिती तंत्रज्ञान, बहूमजली इमारती (सीप्झ):-** महाराष्ट्र शासनाच्या धोरणात्मक निर्णयास अनुसरुन महामंडळाने राज्यात माहिती व तंत्रज्ञान उद्यानेसाठी सन २०२५-२०२६ च्या सुधारीत अंदाज पत्रकामध्ये एकुण रु.१०.११ कोटी व सन २०२६-२०२७ च्या मूळ अंदाजपत्रकात एकूण रु. ०.२३ कोटी तरतूद केली आहे.

४) **सांडपाणी प्रक्रीया केंद्र व जलनि:सारण केंद्र :-** सांडपाणी प्रक्रीया केंद्रासाठी सन २०२५-२०२६ वर्षाकरिता सुधारीत अंदाजपत्रकात रू. ४८९.३३कोटी व सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता रू.३१९.१६ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

५) **अनामत स्वरूपाची कामे:-** महामंडळ शासनाच्या वतीने तसेच अन्य विभाग, खाजगी संस्थाकडून अनामत रक्कम तत्वावर कामे करित असते त्याकरिता सन २०२५-२०२६ या सुधारीत अंदाजपत्रकात रू.७४३.२८ कोटी तसेच सन २०२६-२०२७ या वर्षात रू. ८२०.९१ कोटीची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

६) **इतर:-** महामंडळाच्या कामकाजासाठी वाहने फर्निचर, यंत्रसामुग्री तसेच अग्निशमन,सामान्य प्रशासन विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग,अभियांत्रिकी विभागासाठी यंत्रसामुग्री याकरिता सन २०२५-२०२६ चे सुधारीत अंदाजपत्रकात रू. २६२.६६ कोटी तसेच सन २०२६-२०२७ या वर्षाकरिता रू. २७५.०५ कोटी तरतूद करण्यात आलेली आहे.

७) **साठा, गुंतवणूक व आगाउ रकमा :-** साठा, गुंतवणूक तसेच कर्मचारी व कंत्राटदार यांना द्यावयाचे अग्रिम रक्कम व इतर वसूल करावयाची रक्कम याकरिता सन २०२५-२०२६ या सुधारीत अंदाजपत्रकात रू. २६९.४१ कोटी तसेच सन २०२६-२०२७ या वर्षात रू.२८१.३० कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

८) **जमिन मोबदला :-** शासनाच्या वतीने महामंडळ खाजगी जमिन खरेदी करीत असते व त्याकरिता संबधीतांना जमिन मोबदला अदा करण्यात येत असतो. याकरिता सन २०२५-२०२६ या वर्षात भूसंपादनासाठी रू. १८६२.२५ कोटी व डीएमआयसी प्रकल्पासाठी रू. ५५.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच सन २०२६-२०२७या वर्षाकरिता भूसंपादनासाठी रू. ९२५२.०२ कोटी व डीएमआयसी प्रकल्पासाठी रू. १७५६.१८ कोटी एवढी एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

<u>महसूली खर्च - (देखभाल व दुरूस्ती)</u>

महसूली खर्चामध्ये, पाणीपुरवठा योजना व औद्योगिक क्षेत्रांच्या देखभालीवर होणारा खर्च यांचा प्रामुख्याने समावेश आहे व हा अत्यावश्यक सेवावरील खर्च म्हणून केला जातो. या महसूली खर्चाची तरतुद करताना जास्तीत जास्त काटेकोरपणा अवलंबिण्यात आलेला आहे. सन २०२५-२०२६ च्या सुधारीत अंदाजपत्रकात रु. २७१७.५४ कोटी व सन २०२६-२०२७च्या मूळ अंदाजपत्रकात रु. २८९८.९४ कोटी तरतूद करण्यात आली आहे.

सन २०२६-२०२७चे मूळ अंदाजपत्रक व कामाचा कार्यक्रम तसेच सन २०२५-२०२६ चे सुधारीत अंदाजपत्रक संचालक मंडळाच्या मंजूरीस प्रस्तावीत आहे. या अंदाजपत्रकास संचालक मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यावर ते राज्य शासनाच्या मंजूरीअंती विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे शासनाकडून सादर केले जाईल.

म. औ. वि. महामंडळाच्या सन २०२६-२०२७चे मूळ अंदाजपत्रक व घेण्यात येणा-या कामांचा कार्यक्रम तसेच सन २०२५-२०२६ चे सुधारीत अंदाजपत्रकास मंजूरी प्रदान करण्याकरीता प्रारुप ठराव खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

oooo

सन २०२५-२०२६ च्या सुधारीत अंदाजपत्रकानुसार सुरु असलेली कामे

- **पाणीपुरवठा योजना .**

१. शहाड व बारवी पाणीपुरवठा योजना.... शहाड येथील जलशुद्धीकरण केंद्र ते डोंबिवली औद्योगिक क्षेत्रा पर्यंत ९०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करून टाकणे व जोडणे.

२. बारवी पाणीपुरवठा योजना... बारवी पाणीपुरवठा योजनेच्या साखळी क्र. ६३०० ते १६००० दरम्यानची बारवी गुरुत्व वाहिनी क्र. १ व २ बदलणे.

३. बारवी वॉटर वर्क्स, जांभूळ.... जांभूळ येथील अशुद्ध जलउदंचन केंद्रातील पंपिंग मशिनरी व इतर संबंधित उपकरणांची श्रेणीवाढ व अपग्रेडेशन करणे...

४. तळोजा पाणीपुरवठा योजना... मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विस्तारीत करण्यात आलेला तळोजा औद्योगिक क्षेत्र ते कटाईनाका-बदलापूर रस्त्याचे काम करणे.

५. खोनी ते फॉरेस्ट नाका पर्यंतच्या बारवी गुरूत्व जलवाहिनीच्या सेवा रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे व काकोळेगावाजवळ नवीन पुलाचे बांधकाम करणे.

६. दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र... दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्रात ५० दलली प्रति दिन क्षमतेचे जलशुद्धिकरण केंद्र व जॅकवेल बांधणे, अशुद्ध जलवाहिनी टाकणे व अनुषंगिक कामे करणे.

७. पेण अलिबाग पाणीपुरवठा योजना.. नागोठाणे जॅकवेल ते पोयनाड जलशुद्धीकरण केंद्रा दरम्यान १५०० मि.मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करून टाकणे व जोडणी करणे.

८. पेण अलिबाग पाणीपुरवठा योजना... पोयनाड येथे १२० द.ल.ली.प्र.दि. क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता वाढवून २४० द.ल.ली.प्र.दि. करणे व संबंधित संरचनांचे बांधकाम करणे तसेच नागोठणे येथील जॅकवेलचा विस्तार करणे.

९. शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्र... पोयनाड जलशुद्धीकरण केंद्र ते शहापूर धेरंड औद्योगिक क्षेत्रा पर्यंत पाणी पुरवठ्यासाठी १५०० मि.मी. व्यासाची मुख्य मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करणे, टाकणे आणि जोडणे तसेच धेरंड औद्योगिक क्षेत्रात १००० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवितरण वाहिन्या पुरविणे.

१०.नागपूर (अतिरिक्त बुटीबोरी) औद्योगिक क्षेत्र.... अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रासाठी वडगाव धरणातून ६० एमएलडी क्षमतेची पाणीपुरवठा योजना उपलब्ध करून देणे .

११.बारवी वॉटर वर्क्स जांभूळ ... जांभूळ जलशुद्धिकरण केंद्रातील शुद्धजल उदंचन केंद्राची व ईएचव्ही सबस्टेशनची श्रेणीवाढ आणि अपग्रेडेशन करणे.

१२.दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र.... दिघी बंदराभिमुख औद्योगिक क्षेत्र व लेदर क्लस्टरकरीता अनुषंगिक उपकरणांसह पंपिंग मशिनरी, विद्युत उपकेंद्र पुरविणे, जॅकवेल व जलशुद्धिकरण केंद्राकरीता उच्चदाब - लघुदाब विद्युत वाहिन्या व विद्युत पुरवठा व्यवस्था यासह संबंधित उपकरणे पुरवणे.

१३.टीटीसी पाणीपुरवठा योजना .... टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील आर, ए, सी व डी ब्लॉकमध्ये ईएसआर, जीएसआर, पंप हाऊसचे बांधकाम करणे.

१४.तळोजा व अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्र...पाणीपुरवठा योजना ..... तळोजा व अति. तळोजा औद्योगिक क्षेत्राकरीता १०७०० घ.मी. क्षमतेच्या उंचावरील पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे. तसेच भूखंड क्र. ओएस-४५ येथे जलउदंचन केंद्रासह २०००० घ.मी. क्षमतेची शुद्ध पाण्याची टाकी बांधणे, जलवाहिन्या टाकणे, उंचावरील पाण्याच्या टाकीकडे जाण्याकरीता रस्ता बांधणे व अनुषंगिक कामे करणे.

१५.तळोजा व अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्र...पाणीपुरवठा. ..... तळोजा औद्योगिक क्षेत्रात भूखंड क्र. ओएस-४५ वर २०००० घ.मी. क्षमतेची शुद्ध पाण्याची टाकी पंपिंग व्यवस्थेसह बांधणे व भूखंड क्रमांक एएम-१९ वर संप बांधणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणे.

१६.महापे जंक्शन ते उरण फाट्या पर्यंत १२०० मि.मी. व्यासाच्या दक्षिण फीडर मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करून टाकणे व कार्यान्वित करणे.

१७.शहाड बारवी पाणीपुरवठा योजना.. शहाड येथील जलशुद्धीकरण केंद्र ते डोंबिवली पर्यंत ९०० मि.मी. व्यासाचा मृदु पोलादी जलवाहिनीचा पुरवठा करून टाकणे व जोडणे. शहाड येथे शुद्ध जल व अशुद्ध जल उदंचनगृहाकरीता इलेक्ट्रिकल पॅनेल, व्हॉल्व्ह, सबस्टेशन व ऑटोमेशनसह पंपिंग मशिनरीचा पुरवठा करणे, उभारणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे.

रस्त्यांची कामे

१. रस्ते ... अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा पुरवणे ... अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्रासाठी चार पदरी रस्ते, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा मुख्य व जलवितरण वाहिन्या, सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे, कासर्डी नदीवरील पूल बांधणे, सामाईक सुविधा केंद्र व वीज पुरवठा पायाभूत सुविधा, पथदिवे इत्यादी विविध पायाभूत सुविधा पुरविणे.

२. तारापूर औद्योगिक क्षेत्र.... बोईसर - नवापूर रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे, आरसीसी बिल्टअप गटारी बांधणे, पदपथ , पथदिवे पुरविणे व अनुषंगिक कामे करणे.

३. टीटीसी औद्योगिक क्षेत्र... पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा.. टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील 'आर', 'ए' आणि 'डी' ब्लॉकमध्ये कॉंक्रीट रस्ते, आरसीसी गटार बांधणे, सांडपाणी संकलन वाहिन्या टाकणे व पथदिवे पुरविणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणे.

४. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा... टीटीसी औद्योगिक क्षेत्रामधील "ए" ब्लॉक भागात "ईएल" ब्लॉक भागात आरसीसी बिल्टअप गटर, पथदिवे पुरविणे व संबंधित कामांसह कॉंक्रीट रस्ते बांधणे.

५. रांजणगाव औद्योगिक क्षेत्र, इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टर (EMC२.०) साठी संतुलित पायाभूत सुविधा पुरवणे फेज III, "प्लग अँड प्ले" लेआउटमध्ये पायाभूत सुविधा पुरवणे

६. तळोजा औद्योगिक क्षेत्र.. रासायनिक, नवीन रासायनिक झोन व एल, एम, व्ही, टी ब्लॉकमध्ये सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यांचे बांधकाम आरसीसी बिल्टअप गटारांसह करणे.

७. अलिबाग-वडखळ रस्त्यापासून औद्योगिक क्षेत्रापर्यंत बायपास चार पदरी रस्त्याचे बांधकाम (चार पदरी सीसी ॲप्रोच रोड आणि दोन पदरी सीसी अंतर्गत रस्त्याचे बांधकाम ज्यामध्ये आरसीसी बांधलेले गटार, पूल, बॉक्स कल्व्हर्ट, स्ट्रीट लाईट इत्यादी आणि संबंधित कामे).

८. तळोजा Ind . क्षेत्र¤ तळोजाचा विकास स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून औद्योगिक क्षेत्र .

९. टीटीसी औद्योगिक क्षेत्र¤¤ टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे नूतनीकरण आणि सुशोभीकरण

१०.दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र (DPIA)... DPIA ला जाण्यासाठी रस्ता, जॅकवेल ते WTP पर्यंतचा रस्ता, पहूर ते रस्ता. फाटा ते पहूर .

११.टीटीसी औद्योगिक क्षेत्र.... पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा .... 'ए', 'ईएल', 'आर' ' सी', आणि 'के', ब्लॉकमध्ये आरसीसी बांधलेल्या गटारांसह संतुलित रस्त्याचे बांधकाम, पथदिवे आणि संबंधित कामे.

१२.अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्र. अतिरिक्त अंबरनाथ औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे संतुलन राखण्यासाठी मजबुतीकरण आणि सुधारणा करणे.

१३.पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र.... विविध ठिकाणी आरसीसी गटार आणि नाल्यासह सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे.

१४.महाड औद्योगिक क्षेत्र... नांगलवाडी फाटा ते जलशुद्धिकरण केंद्रापर्यंत चार पदरी सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम ते जल विद्युत पुरवठा केंद्र आणि विद्युत काम, पथदिव्यांचे खांब बसवणे आणि चालू करणे आणि नांगलवाडीहून एचटी आणि एलटी लाईन्सचे स्थलांतर . फाटा ते WTP.

१५.टीटीसी इंडस्ट्रियल क्षेत्र .... यादवनगर जवळील " इलठाण " आणि टीटीसी औद्योगिक क्षेत्रामधील तुर्भे येथील "डी" ब्लॉकमध्ये ट्रक टर्मिनसचा विकासीत करणे.

१६.रांजणगाव औद्योगिक क्षेत्र. टप्पा -III... इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्लस्टर (इएमसी-२.०) साठी पायाभूत सुविधा पुरवणे .. सिमेंट कॉंक्रीट बांधीव गटारे व केबल ट्रेंचसह अंतर्गत रस्ते बांधणे व ट्रक टर्मिनसचे बांधकाम करणे.

१७.अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र.. पंतप्रधान मित्र पार्क योजनेत (टप्पा-१) पायाभूत सुविधा पुरवणे.

सांडपाणी निःसारण योजनेची कामे:-

१. अतिरिक्त तळोजामध्ये पायाभूत सुविधा पुरवणे औद्योगिक क्षेत्र. अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्र ... अतिरिक्त तळोजा औद्योगिक क्षेत्रासाठी चार पदरी मार्ग, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा मुख्य व वितरण वाहिन्या, सांडपाणी संकलन व वितरण नेटवर्क, कासर्डी नदीवरील पूल बांधणे, सामाईक सुविधा केंद्र व वीज पायाभूत सुविधा तसेच पथदिवे इत्यादी विविध पायाभूत सुविधा पुरविणे.
२. डोंबिवली औद्योगिक क्षेत्र.... डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात व निवासी विभागामध्ये आरसीसी नाल्यांसह विद्यमान यूसीआर नाल्यांचे पुनर्बांधणी करणे पावसाळी पाण्याचे निचरा होण्याकरीता आरसीसी गटर बांधणे.
३. अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात सांडपाणी संकलन प्रणालीसह मलनिःसारण प्रक्रिया केंद्राचे बांधकाम करणे.
४. वाघिवली खाडीत खारफुटीतील सांडपाणी निःसारण वाहिनी बदलणे व सांडपाणी निःसारण वाहिनी ३.३० किमीने वाढवणे.
५. बदलापूर औद्योगिक क्षेत्र.... बदलापूर सांडपाणी संकलन टाकीपासून अंबरनाथ आरओबी सांडपाणी संकलन टाकीपर्यंत प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याच्या निःसारणाकरीता ८०० मि.मी. व्यासाची एचडीपीई उर्ध्व सांडपाणी वाहिनी पुरवणे, टाकणे, जोडणे व कार्यान्वित करणे, ज्यामध्ये नवीन टाकी बांधणे व विद्यमान सांडपाणी संकलन टाकी, उदंचनगृह इत्यादींचे पुनर्बांधणी तसेच इलेक्ट्रोमेकॅनिकल कामे करणे.
६. डोंबिवली औद्योगिक क्षेत्र..... उल्हास नदीमुखामध्ये ठाकुर्ली रेल्वे पुलापासून आउटफॉल पॉइंट (डिफ्यूजर) पर्यंत एचडीपीई मरीन आउटफॉल पाइपलाइन टाकणे.
७. अरबी समुद्रात लँडफॉल पॉइंटपासून आउटफॉल पॉइंट (डिफ्यूझर) पर्यंत १००० मिमी, ओडी एचडीपीई मरीन आउटफॉल पाइपलाइन पुरवणे आणि टाकणे.

इमारत बांधकामे

१. दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र.. रातवडरायगड येथील मेगा लेदर फूटवेअर आणि जिल्हा , ॲक्सेसरीज क्लस्टरसाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे .
२. रत्नागिरी औद्योगिक क्षेत्र स्मार्ट सिटी रत्नागिरीचा विकास ....व रत्नागिरी नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी विविध शाळाप्राथमिक आरोग्य केंद्रे आणि इतर विविध कामे , . दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे ,बांधणे
३. वागळे औद्योगिक क्षेत्रातील कर्मचारी निवासस्थानांचा पुनर्विकास करणे.
४. नागपूरनाशिक ,, पुणे, अमरावतीसंचालन आणि ,छत्रपती संभाजीनगर येथे देखरेख , समर्थनासह कौशल्य विकास केंद्रांची स्थापनाकरणे

५. छत्रपती येथे देखरेख ऑपरेशन आणि समर्थनासह कौशल्य विकास केंद्रांची स्थापना . नाश ,संभाजीनगर नागपूरिक आणि पुणे

६. अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रसंचालन आणि समर्थनासह कौशल्य ,देखरेख ... विकास केंद्राची स्थापना.

- **<u>ठेव अंशदान कामे:-</u>**

१. नवी मुंबईतील कळंबोली येथील भूखंड क्रमांक ४८० वर ॲपेक्स इन्स्टिट्यूट (एम हब) ची स्थापना करणे. २०२३-२४ साठी इन्क्युबेशन सेंटर इमारतीचे बांधकाम व संबंधित कामे करणे.

२. नवी मुंबईतील कळंबोली येथील भूखंड क्रमांक ४८० वर ॲपेक्स इन्स्टिट्यूट (एम हब) ची स्थापना करणे निवासी व आयटी सक्षम सेवा इमारतीचे बांधकाम व संबंधित कामे करणे.

३. पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.. कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी , हातकणंगले व यड्राव या सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये
झेएलडी सह सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे अद्यवतीकरण करणे.

४. पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.. कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी , हातकणंगले व यड्राव या सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये
झेएलडी सह सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे अद्यवतीकरण करणे.

५. टीटीसी औद्योगिक क्षेत्र... टीटीसी औद्योगिक क्षेत्रामधील इलेक्ट्रॉनिक्स झोनमधील मेसर्स इंडिया ज्वेलरी पार्कसाठी ईएल-२३७ मधून कचऱ्याचे उत्खनन करून विल्हेवाट लावणे.

६. माणगाव, तळा, रोहा आणि श्रीवर्धन तालुक्यातील तलाठी व मंडळ कार्यालयांसाठी नवीन प्रशासकीय इमारतींचे बांधकाम एमआयडीसीसाठी भूसंपादनासाठी एमआयडीसीने देय असलेल्या सेवा आणि सुविधा शुल्कातून करणे.

****

निविदा प्रक्रियेअंतर्गत कामे
आणि अर्थसंकल्पीय अंदाजातील प्रस्तावित कामे २० २५ -२०२६

- **<u>पाणीपुरवठा योजनाः-</u>**

१. राजीव गांधी इन्फोटेक पार्क, हिंजवडी ... हिंजवडी परिसरातील पाणीपुरवठा योजनेचे अपग्रेडेशन करणे.
२. नंदुरबार (भालेर) औद्योगिक क्षेत्र... कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना... अतिरिक्त २० दललीप्रदि पाणीपुरवठा योजना पुरविणे.
३. नवीन पाताळगंगा पाणीपुरवठा योजना... अशुद्ध व शुद्ध जलशुद्धिकरण केंद्रातील विद्यमान प्रणालीचे नूतनीकरण करणे.
४. खर्डी औद्योगिक क्षेत्र... पाणीपुरवठा योजनेचे देयक जलसंपदा विभागाकडे सुपूर्द करणे.
५. इंदापूर पाणीपुरवठा योजना... चांदगाव जॅकवेल ते इंदापूर येथील जलशुद्धीकरण केंद्रा पर्यंतची ३०० मि.मी. व्यासाची अशुद्ध उर्ध्व जलवाहिनी, ४५० मि.मी. व्यासाच्या डीआय क्लास के-९ प्रकारच्या जलवाहिनीने बदलणे .
६. वाळूज येथील केंद्रीकृत पाणी योजना... जुन्या १०५० मिमी व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीचा खराब झालेला भाग नवीन १०५० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीने बदलणे.
७. चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.४... ४५० मि.मी. व्यासाची डीआय के-९ प्रकारची शुद्ध जलवाहिनी चाकण टप्पा क्र. २ मधील भूखंड क्र. ३१ पासून प्रस्तावित ईएसआर पर्यंत व प्रस्तावित ईएसआर पासून टप्पा क्र. ५ च्या सीमेपर्यंत पुरवठा करून टाकणे व जोडणी करणे. तसेच टप्पा क्र. -२ मधील भूखंड क्र. ओएस -३० जवळ १६०० घनमीटर क्षमतेचे आरसीसी एलिव्हेटेड सर्व्हिस रिझर्व्होअर बांधणे व चाकणला पाणीपुरवठा करण्यासाठी पार्ट लेआउटमध्ये पी/एल/जे विभागामध्ये जलवितरण वाहिन्या टाकणे.
८. बारवी धरणाची उंची वाढवणे ... पुनर्वसनाचे काम... तोंडली १, २ व मनिवली १, २ गावठाणच्या रस्त्याच्या कडेला आरसीसीचे उघडे गटार बांधणे.
९. देवरी ग्रोथ सेंटर ... सिरपूर धरणावर प्रस्तावित ६ एमएलडी क्षमतेची कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना आणि देवरी जी सेंटरवर प्रस्तावित ३ एमएलडी क्षमतेचा जलवाहिनी प्रकल्प.
१०.अतिरिक्त सिनर औद्योगिक क्षेत्र.. पीएपी.. अतिरिक्त सिन्नर औद्योगिक क्षेत्र एसईझेडमध्ये पीएपी, एसईझेड लेआउटसाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे.

- **रस्त्यांची कामे**

१. राजीव गांधी इन्फोटेक पार्क टप्पा -१ व ३ पासूनच्या विद्यमान रस्त्याचे मजबुतीकरण कॉंक्रीटसह करणे व एसएच १३० रस्त्यावर उड्डाणपुल बांधणे.

२. अतिरिक्त कोटोल औद्योगिक क्षेत्राकरीता पायाभूत सुविधा पुरविणे.
३. हर्णे (दापोली) औद्योगिक क्षेत्र... हर्णे (दापोली) येथे प्रस्तावित "मेगा ॲक्वा मरीन पार्क" ला विविध पायाभूत सुविधा पुरवणे.
४. चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ करीता पायाभूत सुविधा पुरवणे ... मुख्य रस्त्याचे बांधकाम करणे.
५. अतिरिक्त कारंजा औद्योगिक क्षेत्र .. अतिरिक्त कारंजा येथे पायाभूत सुविधांची विकास कामे करणे.
६. चाकण औद्योगिक क्षेत्र... चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा १ व २ मधील मुख्य रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे.
७. नंदूरबार औद्योगिक क्षेत्रातील टप्पा १ मध्ये पायाभूत सुविधा पुरवणे.
८. निवेंडी औद्योगिक क्षेत्र.. आंबा, काजू आणि फूड पार्कसाठी मुख्य रस्ता, पाणीपुरवठा, पथदिवे आणि इतर प्राथमिक सुविधांचे बांधकाम व विकास कामे करणे.
९. चाकण औद्योगिक क्षेत्र, टप्पा क्र. ३... आळंदी (स्पायसर चौक) ते स्कोडा कंपनी पर्यंत कॉंक्रीट रस्ता बांधणे.

- **<u>सांडपाणी निःसारण योजनेची कामे : -</u>**
  १. पीएम मित्र पार्कसाठी विद्यमान सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राचे संवर्धन करणे.
  २. महाड औद्योगिक क्षेत्र... सांडपाणी निःसारण योजना... आवश्यक पंपिंग आणि इनलेट आणि आउटलेट व्यवस्थेसह प्रक्रिया केलेले सांडपाणी साठवण टाकी (१२ दललीप्रदि क्षमतेची) बांधणे.
  ३. तारापूर औद्योगिक क्षेत्र ... नवापूर किनाऱ्यावर ७.१ किमी अंतरावर समुद्रात सांडपाणी सोडण्यासाठी नवापूर इनलाइन बूस्टर पंपिंग स्टेशनची रचना, पुरवठा, स्थापना, कार्यान्वित करणे, परिचालन व देखभाल करणे.
  ४. खर्डी औद्योगिक क्षेत्र... वस्त्रोद्योग विकास, टेक्सटाईल पार्क व लॉजिस्टिक हब विकसीत करणे.. खर्डी औद्योगिक क्षेत्रात सांडपाणी संकलन प्रणालीसह २.५ दललीप्रदि क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया संयंत्राचे बांधकाम करणे तसेच सामायिक सुविधा केंद्राचे बांधकाम करणे.
  ५. तळोजा औद्योगिक क्षेत्र... सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या परिसरात सांडपाणी संकलन संपचे बांधकाम करणे.

- **<u>इमारत बांधकाम :-</u>**
  १. मरोळ औद्योगिक क्षेत्रातील बरॅक इमारत पाडणे व त्या ठिकाणी कॉन्फरन्स हॉल, कॅन्टीन, जिम व स्टोअर रूमचे बांधकाम करणे.
  २. रत्नागिरी येथे टाटा टेक्नॉलॉजी लिमिटेड यांच्या मार्फत सीआयआयआय प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे.
  ३. नवापूर औद्योगिक क्षेत्र... बी प्रकारच्या अग्निशमन केंद्राचे बांधकाम व संबंधित कामे करणे.

४. डोंबिवली येथील भूखंड क्र. पी -४९ मधील संत सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलाचा पुनर्विकास करणे (टप्पा १).
५. पीएम मित्र पार्कसाठी प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा विकसीत करणे.
६. धुळे औद्योगिक क्षेत्र... कार्यालयीन इमारतीचे बांधकाम... कार्यालयीन इमारतीचे अंतर्गत कामे करणे.
७. पीएम मित्रा पार्कमध्ये प्रशासकीय इमारत, कमांड कंट्रोल इमारत व मुले - मुलींसाठी वसतिगृह इत्यादींचे बांधकाम करणे.
८. उजलाईवाडी (सरकारी जमीन) येथे व्हीव्हीआयपी अतिथीगृह बांधणे.
९. रत्नागिरी औद्योगिक क्षेत्र... कॉयर आणि खादी विभागासाठी सामाईक सुविधा केंद्र व प्रशिक्षण केंद्र विकासीत करणे.
१०. विळे-भागाड (विकास केंद्र) औद्योगिक क्षेत्र.. विळ भागाड औद्योगिक क्षेत्रात बी प्रकारच्या अग्निशमन केंद्राचे बांधकाम व संबंधित कामे करणे.
११. नरिमन पॉइंट येथील एक्सप्रेस टॉवर येथील चौथ्या मजल्यावर असलेल्या एमआयडीसीच्या मुख्य कार्यालयाच्या नूतनीकरणासाठी डिझाइन आणि बांधकाम संकल्पना ... ऑडिओ, व्हिडिओ, प्रकाश व्यवस्था यांची एकत्रीत उभारणी करून कार्यान्वित करणे.
१२. नागपूर (अतिरिक्त बुटीबोरी) औद्योगिक क्षेत्र "प्लग अँड प्ले" मध्ये बहुउपयोगी संकुलाचे बांधकाम मॉडेल शेड लेआउट सर्वेक्षण करणे, वास्तुशिल्प रेखाचित्रे, स्ट्रक्चरल डिझाइन आणि तपशीलवार अंदाज तयार करणे.

- **<u>ठेव अंशदान कामे:-</u>**
  १. सिन्नर तालुका औद्योगिक सहकारी इस्टेट लिमिटेड (एसटिआयसीई), मुसळगाव , सिन्नर , नाशिक येथे ५ दलली प्रदि क्षमतेचे सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र विकसीत करणे.
  २. नवी मुंबईतील कळंबोली येथील एमएसएसआयडीसीच्या भूखंड क्रमांक ४८० वर ॲपेक्स इन्स्टिट्यूट (एम हब) ची स्थापना इनक्युबेशन सेंटर इमारतीचे बांधकाम आणि संबंधित कामे. प्रकल्प व्यवस्थापन कन्सल्टन्सी नेमणूक करणे.
  ३. लोटे परशुराम औद्योगिक क्षेत्र .. वशिष्ठी नदीवर जॅकवेल जवळ कोल्हापूर बंधारा बांधणे.
  ४. मुसळगाव जिल्हा-नाशिक येथील सिन्नर तालुका इंडस्ट्रियल कंपनी ऑप. इस्टेट लिमिटेड औद्योगिक क्षेत्रातील रस्ता सी, डी , ई व रस्ता क्र. १ ते २७ पर्यंतच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे.
  ५. सिद्धिविनायक सहकारी इस्टेट, ता. निफाड ... पायाभूत सुविधा पुरवणे.

६. महसूल उत्पन्न आणि खर्च				
				(रु. लाखात)
अ. क्र.	तपशील	अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६	सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६	अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७
	१-महसुली उत्पन्न			
१	पाणी शुल्क	१,०८,०६३.९९	१,०५,०१९.११	१,०५,७६५.०८
२	सेवा शुल्क	१५,६७५.५७	१६,९४४.१६	१८,०३४.९४
३	अग्निशमन उपकर	३,२७७.९१	३,५१०.००	३,७५८.२७
४	जलनिस्सारण उपकर	१०,३८१.११	६,७११.११	७,१९२.७९
५	निवासी इमारत	५४३.२८	६८४.०१	७१८.२१
६	इतर प्राप्ती	२२.४३	२४.६६	२५.८९
७	व्याज	१८,२११.७७	१६,१३५.७०	१६,५६७.४६
८	मुदत ठेव शिल्लक	०.००	०.००	०.००
	एकूण महसुली उत्पन्न	**१,५६,१७६.०६**	**१,४९,०२८.७५**	**१,५२,०६२.६५**
	२- देखभाल आणि दुरुस्ती खर्च			
१	प्रशासकीय आणि कार्यकारी खर्च			
	i) आस्थापना शुल्क	२३,८६६.२७	२६,३५७.३६	२८,५७८.००
	ii) आकस्मिक खर्च	३०,५९६.७३	३९,४१३.७४	४४,७११.५७
२	पाणीपुरवठा योजनेसाठी देखभाल व दुरुस्ती	१,७६,९२७.६१	१,८८,१९५.३६	१,९९,५६१.१९
३	औद्योगिक क्षेत्र देखभाल व दुरुस्ती	१५,२५५.९०	२०,७८४.१२	२१,१२३.९९
४	ड्रेनेज + सीईटीपी देखभाल व दुरुस्ती	१४,२६७.७३	१४,३७०.१२	१५,४२४.४४
५	अग्निशमन केंद्र देखभाल व दुरुस्ती	६,१४९.५७	३,३७६.८९	४,०६२.४३
६	निवासी इमारत देखभाल व दुरुस्ती	१७७६.१७	२७२२.३९	३००७.९५
७	अनिवासी इमारती देखभाल व दुरुस्ती	९,४९१.३५	१०,८८९.४८	११,२५९.९१
८	यंत्रसामुग्री देखभाल व दुरुस्ती	३६२०.२५	३३४७.३७	३६३७.९९
९	व्याज	१२३४.३६	१२५३.६७	१३१६.३५
१०	इतर	३,५८९.६७	५,४६७.१५	५,७४०.५१
११	घसारा	६६५.५०	१४०००.००	१५०००.००
	एकूण (१ ते १०) --	**२,८७,४४१.११**	**३,३०,१७७.६४**	**३,५३,४२४.३३**
	भांडवली खर्चात कमी हस्तांतरित	४४,३७५.५२	५८,४२३.८०	६३,५३०.४४
	महसूल खर्च	**२,४३,०६५.५९**	**२,७१,७५३.८४**	**२,८९,८९३.८९**
	तूट	-८६,८८९.५३	-१,२२,७२५.०९	-१,३७,८३१.२४

७-भांडवली उत्पन्न आणि खर्च				
				(रु. लाखात)
अ. क्र.	तपशील	अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६	सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६	अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७
	भांडवली उत्पन्न			
१	भूखंडांच्या विक्रीतून मिळणारा जमिनीचा प्रीमियम	१६२९२६.०१	५७९४४६.४३	३९१२७९.१८
२	सेझमधील भूखंडांची विक्री	०.००	५४.७५	४५.०५
३	शेड व गाळे / एफ.एफ. इलेक्ट्रिक इस्टेट / ट्रेड सेंटर	०.००	३१.५०	३४.६५
४	आयटी पार्क्स / बहुसंख्यक इमारती.	५३.९९	१०.००	११.००
५	पर्यावरण उपकर	६१५५.७	९५५४.५८	९९१८.८८
६	वार्षिक भाडे आणि इतर	४९३.८५	२७१२.१०	२९८१.५७
७	विकास शुल्क	३८३५९.२७	४८१७२.३२	५१८७७.८९
८	अग्निसुरक्षा शुल्क	१४५६९.९०	१५०००.०८	१५५००.००
९	सरकारच्या वतीने ठेवीवरील व्याज.	४९०२२.००	५६७८४.००	४२५७७.००
१०	विविध कर्जदार आणि इतर विविध ठेवी	१५६८३१.०५	६६१६५.३४	८३२३९.४६
११	ठेव योगदान कार्ये	७२५०८.७४	७४३२८.०९	८२०९१.३६
१२	मुदत ठेव शिल्लक	०.००	०.००	०.००
१३	इतरांकडून कर्ज	०.००	०.००	०.००
	एकूण भांडवली उत्पन्न	**५००९२०.५१**	**८५२२५९.१९**	**६७९५५६.०४**
	भांडवली खर्च			
१	एमआयडी बाँडची परतफेड	०.००	०.००	०.००
२	औद्योगिक क्षेत्राचा विकास	३५४४००.५१	३६८१६८.०५	३७६७६८.१३
३	विशेष आर्थिक क्षेत्र	५६.१०	०.००	०.००
४	जलनिस्सारण	४८७२०.२३	४८६५७.०७	२६०४४.०५
५	सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र	६५१.९१	२७५.९१	५८७१.८१
६	उद्योग भवन/उद्योग सदन, फ्लॅटेड फॅक्टरी	४.००	०.००	०.००
७	डीएमआयसी	०.६०	१०.९०	१.००
८	अनिवासी इमारत, ऑफिस कॉम्प्लेक्स	७०२.५०	३५२.८०	१८५.१०
९	आयटी पार्क्स	५०.१०	१०१०.६०	२२.६०
१०	पाणीपुरवठा योजना: केंद्रीकृत आणि स्थानिकीकृत	२२३२२३.९०	१९५४९२.९५	१८९३५१.५१
११	शासन तत्त्वावरील आणि स्थानिक खाजगी संस्थांच्या वतीने ठेव योगदान कार्य	७२५०८.७४	७४३२८.०९	८२०९१.३६
१२	ट्रक टर्मिनस, निवासी इमारत आणि औद्योगिक गृहनिर्माण	७०२.००	८९७.५०	२१.००
१३	अग्निशमन केंद्राचे बांधकाम	९८१.००	१२९५.५४	८५३.२०
१४	टी अँड पी .मुख्यालयातील अभियांत्रिकी , अग्निशमन , आयटी सेल, साप्रवि आणि इतर विभाग	२३०७८.१०	२६२६६.२६	२७५०५.००
१५	साठा	५५०.००	५५०.००	५५०.००
१६	गुंतवणूक	३००.००	३००.००	३००.००
१७	आगाऊ रक्कमा	२६६७८.४३	२३०६५.५९	२३९५२.१२
१८	मॅग्नेटिक महाराष्ट्र	३०२५.००	३०२५.००	३३२७.५०
१९	जमीन भरपाई	२८८६३९.००	१८६२२५.००	९२५२०२.००
२०	डीएमआयसी जमीन भरपाई	२५६२२.००	५५००.००	१७५६१८.००
	एकूण भांडवली खर्च	**१०६९८९४.१२**	**९३५४२१.२६**	**१८३७६६४.३८**
	विकास कामासांठी महसूली खर्चातून स्थानांतरित	४४३७५.५२	५८४२३.८०	६३५३०.४४
	निव्वळ भांडवली खर्च	**१११४२६९.६४**	**९९३८४५.०६**	**१९०११९४.८२**
	तूट ---	**-६१३३४९.१२**	**-१४१५८५.८७**	**-१२२१६३८.७८**

अंदाजपत्रकाचा सारांश (फॉर्म ८)						
						(रु. लाखात)
प्रत्यक्ष रक्कम				अंदाजपत्रकीय तरतूद		
२०२२-२०२३	२०२३-२०२४	२०२४-२०२५	लेखा शीर्ष व उपशीर्ष	अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६	सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज २०२५-२६	अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७
१	२	३	४	५	६	७
			महसुली जमा			
४२३७२.५४	११६०४६.७०	८९४२४.८९	पाणी पट्टी पावती	१,०८,०६३.९९	१०५०१९.११	१०५७६५.०८
१४४२५.९०	१४२२९.३०	१४२८७.२३	सेवा शुल्क	१५,६७५.५७	१६९४४.१६	१८०३४.९४
२९२८.८७	३२३४.९८	३०८८.५०	अग्निशमन सेवा शुल्क	३,२७७.९१	३५१०.००	३७५८.२७
९९१९.५६	९५८३.१०	९५३४.५८	सांडपाणी वाहिनी शुल्क	१०,३८१.११	६७११.११	७१९२.७९
३६०.८९	२६१.०१	४०२.६१	व्याज	५४३.२८	६८४.०१	७१८.२१
२४.८८	५.४०	१८.२१	निवासी इमारती	२२.४३	२४.६६	२५.८९
३६१३३.४५	३५४४९.३०	११३२४.५६	किरकोळ (विलंब शुल्क, मीटर भाडे, आग विझवण्याचे शुल्क इत्यादी)	१८,२११.७७	१६१३५.७०	१६५६७.४६
१०६१६६.०९	**१७८८०९.७९**	**१२८०८०.५८**	**एकूण महसुली जमा**	**१५६१७६.०६**	**१४९०२८.७५**	**१५२०६२.६५**
			II. महसुली खर्च			
			१- प्रशासकीय खर्च			
२३३३.६३	२२०२.७८	२३६४.३७	अ) आस्थापना शुल्क	२,६६१.११	२६२२.४९	२७५३.६२
३१५०.६८	२२९८.४३	२०५२.८६	ब) आकस्मिक खर्च	६,५३२.८६	८९९६.२८	१२१७२.०७
५४८४.३२	**४५०१.२२**	**४४१७.२३**		**९१९३.९७**	**११६१८.७७**	**१४९२५.६९**
३०२१.५९	२१२०.७५	०.००	क- वजा : देखभाल व दुरुस्ती खर्चाकडे हस्तांतरण	२,४४०.५७	०.००	०.००
६१५.६८	५९५.१२	११०४.३१	ड- वजा : भांडवली खात्यातील विकास खर्चाकडे २५% हस्तांतरण	१,६८८.३५	२९०४.६९	३७३१.४२
१८४७.०५	**१७८५.३५**	**३३१२.९२**	**१:- एकूण (अ + ब) - (क + ड)**	**५०६५.०५**	**८७१४.०८**	**१११९४.२७**
			२- कार्यकारी खर्च			
			१. अभियांत्रिकी			
१५६६२.२१	१४४५४.४१	१२८७८.४०	अ) आस्थापना शुल्क	११,७१६.५२	१३०१३.८२	१४०१७.२९
४१८९.८०	४६८२.९३	३७६९.२४	ब) आकस्मिक खर्च	२,३३४.५५	२४५७.४५	२६७२.५८
	०.००		**२. इतर**			
८३८०.६५	८१५६.१३	८७१३.०१	अ) आस्थापना शुल्क	९,४८८.६४	१०७२१.०४	११८०७.१०
८९५१.८१	१३८९१.४२	१०५०४.२५	ब) आकस्मिक खर्च	२१,७२९.३२	२७९६०.०१	२९८६६.९२
३७१८४.४८	**४११८४.८८**	**३५८६४.९०**	**एकूण -१**	**४५२६९.०३**	**५४१५२.३२**	**५८३६३.८९**
			३. वजा : स्थगित महसुली खर्च			
१०९३७.५०	९०१६.५७	०.००	क) वजा : देखभाल व दुरुस्ती खर्चाकडे हस्तांतरण	३,७२९.९०	०.००	०.००
२६२४६.९८	३२१६८.३१	**३५८६४.९०**	ड- वजा : भांडवली खात्यातील विकास खर्चाकडे १००% हस्तांतरण	४१,५३९.१३	५४१५२.३२	५८३६३.८९
०.००	**०.००**	**०.००**	**एकूण (१-३अ+३ब)**	**०.००**	**०.००**	**०.००**
			३. पाणी पुरवठा योजना (केंद्रीकृत)			
७४३९.२३	८०३६.१५	६१४६.९४	i) आस्थापना	६,०६५.२१	१२६१४.४८	१३६४४.१५
३८०७९.९४	५२७१९.३३	५२६०६.९६	ii) देखभाल / दुरुस्ती / वीज व रसायने - पर्यवेक्षण शुल्क व व्याज	५४,२१०.४४	६७६२७.४४	६८८४३.६२
२२३७८.५०	२९३६६.५७	३२५५७.६६	iii) रॉयल्टी शुल्क	३०,३७५.८३	३४२७३.७९	३७०५५.६६
			iv) इतर	२,५६१.८३	२६५५.७९	२५६१.९०
६७८९७.६८	**९०१२२.०५**	**९१३११.५६**	एकूण ३---	**९३२१३.३१**	**११७१७१.५०**	**१२२१०५.३३**
			४. पाणी पुरवठा योजना (स्थानिक)			
६६८३१.११	६११२७.२५	५१८६.२८	i) आस्थापना	११,०४५.७९	६५२९.६८	७०८६.२६
		२५४७१.६२	ii) देखभाल / दुरुस्ती / वीज व रसायने - पर्यवेक्षण शुल्क व व्याज	४२,३३०.११	३५६६७.४३	३९४७९.२२
		२३९०६.२८	iii) रॉयल्टी शुल्क	२७,३१०.६४	२७९६५.६४	२९९८६.९७
			iv) इतर	३,०२७.७६	८६१.११	९०३.४१
६६८३१.११	**६११२७.२५**	**५४५६४.१८**	**एकूण ४---**	**८३७१४.३०**	**७१०२३.८६**	**७७४५५.८६**
			इतर			
११६८१.२१	१०८५७.४२	९९२७.५३	५) औद्योगिक क्षेत्र	१५,२५५.९०	२०७८४.१२	२११२३.९९
४६९६.१२	५६५५.३८	७०६०.११	६) जलनिस्सारण	९,००७.७३	९०५१.४४	९६१८.६३
५०१०.४२	४६६२.१९	६५११.९२	७) सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्र	५,२६०.००	५३१८.६८	५८०५.८१
४४५५.०१	४७५२.१०	३११६.५७	८) अग्निशमन केंद्र	६,१४९.५७	३३७६.८९	४०६२.४३
१०७७.१०	१०२०.९०	७९८.८५	९) निवासी इमारत	१,७७६.१७	२७२२.३९	३००७.९५
६३७०.३६	७८२७.०४	५७०५.८०	१०) अनिवासी इमारत	९,४९१.३५	१०८८९.४८	११२५९.९१

